# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवड पालिका मांडणार पर्यावरणीय अर्थसंकल्प

**अधिकारी, कर्मचाऱ्यांना क्लायमेट बजेट तयार करण्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका तयार : पुस्तिकेचे प्रकाशन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले**



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने वार्षिक अर्थसंकल्पासोबतच पर्यावरणीय अर्थसंकल्प (क्लायमेट बजेट) प्रसिद्ध केले जाणार असून महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना क्लायमेट बजेट तयार करण्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात आली असून या पुस्तिकेचे प्रकाशन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात पार पडलेल्या प्रकाशन कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, नगररचना उप संचालक प्रसाद गायकवाड, मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले यांच्यासह मुख्य अभियंता, सह शहर अभियंता, उप आयुक्त, साहाय्यक आयुक्त, क्षेत्रीय अधिकारी, कार्यकारी अभियंता यांच्यासह महापालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सन २०२५-२६ पासून नियमित अर्थसंकल्पासोबत पर्यावरणीय अर्थसंकल्प प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच प्रत्यक्ष पर्यावरणीय अर्थसंकल्प तयार करण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक असलेली मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात आली असून या पुस्तिकेचे प्रकाशन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते आज पार पडले आहे.

### चार प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले

» अंगभूत पर्यावरण आणि ऊर्जा: हरित इमारती आणि अक्षय ऊर्जा उपक्रमांद्वारे पारंपरिक ऊर्जेचा वापर कमी करणे.

» वाहतूक: इलेक्ट्रिक वाहने (EVs) आणि सार्वजनिक परिवहन यासारख्या ठिकाणी हरित- स्वच्छ-ऊर्जा वाहतूक प्रणालींना प्रोत्साहन देणे.

» घनकचरा व्यवस्थापन: कचरा-ते-ऊर्जा प्रकल्पांद्वारे कचरा पुनर्वापरात सुधारणा करणे आणि लँडफिलचा वापर कमी करणे

» पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन: पावसाचे पाणी साठवण, सांडपाणी पुनर्वापर आणि पुराच्या पाण्याचे व्यवस्थापन याद्वारे शहरातील पाण्याचे व्यवस्थापन करणे.

"हवामान अंदाजपत्रक फ्रेमवर्कमुळे शहरात खर्च केलेला प्रत्येक रुपया प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हवामानातील लवचिकता मजबूत करण्यासाठी योगदान देईल. यामुळे पिंपरी चिंचवडला ओस्लो, लंडन, न्यूयॉर्क आणि मुंबईसारख्या जागतिक शहरांच्या पंक्तीत आणले जाणार आहे, ज्यांनी वाढत्या हवामान संकटाचा सामना करण्यासाठी समान आराखडा स्वीकारला आहे.

- शेखर सिंह,आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत : योगेश बहल

**पिंपरी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन करण्यात आले**



**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील आठवडाभरापासून थंडी वाढली आहे. त्यातही दोन दिवसांपासून थंडीची तीव्रता अधिक वाढली आहे. या वाढत्या गारठ्यामुळे आणि वातावरणीय बदलामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. यामुळे सर्दी व खोकला याचे रुग्ण वाढले असून नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य अधिकाऱ्यांनी केले आहे.

थंडीचा ऋतू नुकताच कुठे सुरु होतोय, त्यात वातावरणीय बदलामुळे रुग्ण संख्याही झपाट्याने वाढू लागली आहे. वातावरणातील बदलामुळे घरोघरी थंडी, खोकल्याचे रुग्ण आढळून येत आहेत. प्रामुख्याने लहान मुले, वृद्ध नागरिक आणि महिला यांच्यामध्ये आजारी पडण्याचे प्रमाण अधिक आहे. शासकीय व खासगी रुग्णालयात अशा रुग्णाची संख्या अधिक दिसत आहे.

अनेक नागरिक थेट दवाखान्यात जाण्याऐवजी मेडिकलमधून तात्पुरते सर्दी आणि खोकला यांच्या गोळ्या विकत घेत आहेत. परंतु हे योग्य नसून अधिक वेळ वाट न पाहता योग्य उपचार घ्यावेत, असा सल्ला आरोग्य अधिकाऱ्यांनी दिला आहे. सर्दी, खोकला याप्रमाणेच अंगदुखीचे रुग्ण आणि दम्याचे रुग्ण यांचीही संख्या अधिक दिसून येत आहे.

थंडी वाढत असल्याने नागरिकांनी शक्यतो उबदार कपडे वापरावेत. पाणी गरम करून प्यावे व शीत पेयाचा वापर टाळावा. दम्याचे रुग्ण वाढत असून दम्याचा त्रास असलेल्या रुग्णांनी तोंडाला मास्क लावावा व धुळीपासून संरक्षण करावे. तसेच सर्दी खोकला जास्त जात असेल त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधून योग्य औषध उपचार घ्यावेत.

# पोलिसांना आता वाढदिवसाला मिळणार हक्काची सुट्टी

**पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी याबाबतचे आदेश दिले**



**पिंपरी | प्रतिनिधी**

सणांपासून निवडणुकीपर्यंत सततच्या बंदोबस्तात व्यस्त असलेले पोलीस यापुढे स्वतःचा वाढदिवस हक्काची सुट्टी घेऊन कुटुंबासोबत साजरा करू शकणार आहेत. पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी याबाबतचे आदेश पोलीस ठाणे आणि पोलिसांच्या विविध शाखांना दिले आहेत.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी त्यांच्या वाढदिवसाकरिता सुट्टी देण्याचा निर्णय घेतला आहे. पोलीस दल हे प्रशासनिक दृष्ट्या व नागरिकांप्रती जागरूक राहून काम करीत असते. वेळप्रसंगी त्यांना वैयक्तिक कामे असतानाही ते रजेवर जाऊ शकत नाहीत. पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना दैनंदिन कामाच्या व्यापामुळे बरेचदा स्वतःचे वाढदिवस असतानाही कामाकरिता हजर होणे व आपल्या कुटुंबाला वेळ देणे शक्य होत नाही. तसेच दैनंदिन कामाच्या व्यापामुळे त्यांच्यात ताणतणाव निर्माण होऊन त्याचा परिणाम त्यांच्या कामावर होतो. या सर्व बाबींचा विचार करून यापुढे त्यांना त्यांच्या वाढदिवस, करिता सुट्टी देण्याचा निर्णय पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी घेतला आहे.

वाढदिवसाच्या आदल्या दिवशी पूर्वसंध्येला पोलीस ठाण्यांमध्ये संबंधित वरिष्ठ अधिकारी हे पोलीस ठाण्यातील ज्यांचा वाढदिवस आहे. त्या अधिकारी व कर्मचारी यांचा वाढदिवस साजरा करून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा संदेश हे संबंधितांना देतील, असेही पोलीस आयुक्तांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.

# रस्त्यांचा खरा हक्कदार उपेक्षितच, पुण्यात वर्षाला सरासरी 100 पादचाऱ्यांचा मृत्यू

## ज्या रस्त्यावर पदपथ बांधले आहेत, त्यावर अतिक्रमण करून प्रशासनाच्या नाकावर टिच्चून व्यवसाय केले जात आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अनेक रस्त्यांवर पदपथ अस्तित्वात राहिलेले नाहीत. ज्या रस्त्यावर पदपथ बांधले आहेत, त्यावर अतिक्रमण करून प्रशासनाच्या नाकावर टिच्चून व्यवसाय केले जात आहेत. त्यामुळे रस्त्यावर पहिला अधिकार असलेल्या पादचाऱ्याला चालण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. पदपथावर चालता येत नसल्याने रस्त्यावर वाहनांचा सामना करताना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाच्या उदासीन कारभारामुळे गेल्या तीन वर्षांत ३२६ पादचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे पुणे महापालिकेने केवळ 'पादचारी दिन' साजरा करून प्रश्न सुटणार आहेत का, असा प्रश्न पुणेकरांकडून उपस्थित केला जाऊ लागला आहे.

महापालिकेकडून यंदा सलग चौथ्या वर्षी पादचारी दिन साजरा केला जात आहे. हा पादचारी दिन ११ डिसेंबरला लक्ष्मी रस्त्यावर साजरा केला जाणार आहे. त्या निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. मोठ्या थाटामाटात पादचारी दिन साजरा करून महापालिकेचा पथ विभाग स्वत:ची पाठ थोपटून घेत आहे. परंतु पादचाऱ्यांसाठी रस्त्यावर सुस्थितीतील पदपथ बांधण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. अनेक रस्त्यांवर पदपथच शिल्लक ठेवलेले नाहीत. त्यामुळे एक दिवस पादचाऱ्यांसाठी रस्ता मोकळा ठेवून वर्षातील ३६४ दिवसांचे काय, असा प्रश्न पुणेकरांकडून उपस्थित केला जाऊ लागला आहे.

पुण्यात स्मार्ट सिटीच्या नावाखाली रस्त्यांची रुंदी कमी करून काही ठिकाणी पदपथ बांधण्यात आले आहेत. या पदपथावरून पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालता येणे अपेक्षित आहे. परंतु राजकीय व्यक्तींशी संबंधित कार्यकर्ते, माननीयांच्या समर्थकांकडून पदपथावर हातगाड्या, छोटे-मोठे व्यवसाय थाटले जातात. याकडे महापालिकेचे अधिकारीच कानाडोळा करत असून त्यांच्या नावाने बिनधास्तपणे हप्तेखोरी केली जात असल्याचा आरोप पुणेकरांकडून केला जातो. अनेक ठिकाणी धार्मिक स्थळे, छोटी मंदिरे पदपथावर बांधलेली आहेत. पादचाऱ्याला पदपथावर जागा मिळत नसल्याने त्याला नाईलाजाने रस्त्याचा आधार घेत चालावे लागते. थेट वाहनांचा सामना करत जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागतो, त्यामुळे अपघात होत असून गेल्या तीन वर्षांत ३२६ जणांना जीव गमवावा लागला आहे. महापालिका मात्र एका दिवसाचा पादचारी दिन साजरा करून पुन्हा वर्षभर पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करण्यासाठी सोडून देत आहे. हा संवेदनहीनतेचा कळस असल्याची खंत पुणेकर व्यक्त करत असतात.



### शहरवासीयांसाठी उपक्रम

» लक्ष्मी रस्त्यावरील कुंटे चौक ते गरुड गणपती चौक हा भाग वाहनविरहित करून आकर्षक पद्धतीने सजवला जाईल. या दिवशी सकाळी आठ ते रात्री आठ हा रस्ता वाहनांसाठी बंद ठेवला जाणार आहे. या उपक्रमात अधिकाधिक शहरवासीयांना सहभागी होता यावे, यासाठी कसबा, महापालिका आणि मंडई मेट्रो स्थानकापासून सायकली उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच, पीएमपीमार्फत जादा बसदेखील रस्त्यावर आणल्या जातील. रस्तासुरक्षा कार्यशाळा, तसेच दिव्यांग, दृष्टिहीनांसाठी विशेष कार्यक्रम, चित्र प्रदर्शन, सार्वजनिक वाहतुकीसंदर्भात प्रदर्शन, रांगोळी, विविध कला व संगीत कार्यक्रम, हवेच्या गुणवत्तेची चाचणी व स्वच्छ संस्थेचे प्रदर्शन अशा कार्यक्रमांचा यात समावेश असेल, असे पथ विभाग प्रमुख अनिरुध्द पावसकर यांनी सांगितले.

> “ री दिन साजरा करून शोबाजी केली जात आहे. महापालिका पादचाऱ्यांबाबत गंभीर नाही. केवळ पैसे खर्च करण्यात त्यांना उत्साह वाटत असतो. पादचाऱ्यांसाठी काही उपाययोजना करतील अशी अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही.
>
> - विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरिक मंच.

# कबुतर, पारव्यांना खाद्यदानमुळे शहराचे आरोग्य धोक्यात

## कबुतरांना उघड्यावर खाद्यपदार्थ टाकू नये, अन्यथा कारवाई केली जाईल

**पुणे | प्रतिनिधी**

कबुतरांच्या (पारव्यांच्या) पिसांसह विष्ठेतून बाहेर पडणाऱ्या जंतुंमुळे फुप्फुसाशी संबंधित आजार (निम्युनिया) तसेच त्वचेचे आजार होण्याची शक्यता असते. त्यामुळे कबुतरांना उघड्यावर खाद्यपदार्थ टाकू नये. अन्यथा कारवाई केली जाईल, असा आदेश पुणे महापालिकेने काढले आहेत. याबाबतचे फलक लावण्यात आले आहेत. त्यामुळे खाद्य पदार्थ टाकणाऱ्यांनो सावधान...तुमच्या खाद्यदानमुळे शहराचे आरोग्य बिघडत आहे.

शहरात कबुतरांना उघड्यावर मोठ्या प्रमाणावर अन्नपदार्थ, धान्य टाकले जात आहे. राज्यातील अनेक महापालिकांनी याविरोधात कारवाईला सुरुवात केली आहे. अखेर पुणे महापालिकाही ॲक्शन मोडवर आले असून, आता महापालिकेने नागरिकांनी कबुतरांना उघड्यावर मोठ्या प्रमाणावर अन्नपदार्थ टाकू नये, असे फलक लावण्यास सुरुवात केली आहे.



प्राणी, पक्ष्यांना अन्न किंवा धान्य टाकणाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे शहरात ठिकठिकाणी अशाप्रकारचे अन्नधान्य टाकले जाते. मात्र, कबुतरांसाठी टाकलेल्या धान्यामुळे कबुतरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तर या कबुतरांची विष्ठा आणि पंख ठिकठिकाणी पडत आहे. यातून हायपर सेन्सिटिव्ह न्यूमोनियाचा आजार होत असून, हा फुप्फुसाशी संबंधित आहे. हा आजार होण्याचे प्रमाण ६० ते ६५ टक्के आहे.

पुणे शहर परिसरात कबुतरांचे (पारवे) थवेच्याथवे दिसून येतात. ठिकठिकाणी कबुतरांना धान्य टाकले जाते. त्यामुळे कबुतरांची संख्या वाढली असून, विष्ठा आणि पंख सर्वत्र पसरलेले दिसून येते. याचा परिणाम लहान मुलांच्या आरोग्यावर कसा होतो, याचा अभ्यास करण्यासाठी काही वर्षांपूर्वी शहर परिसरातील ५ ते १२ वयोगटातील एक हजाराच्या जवळपास मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये ३७ टक्के मुलांना कबुतरांच्या विष्ठेतून पसरणाऱ्या बुरशीमुळे ॲलर्जी झाली तर ३९ टक्के मुलांना पंखामुळे ॲलर्जी झाल्याचं समोर आले.

# फुकट्या प्रवाशांकडून सव्वा कोटींची वसुली

## वर्षभरात या प्रवाशांकडून तब्बल सव्वा कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

पीएमपीमधून प्रवास करण्यासाठी बसचे किमान तिकीट दहा ते पंधरा रुपये, लांब पल्ल्यासाठी जास्तीत जास्त ४० ते ६० रुपये आहे. तरीदेखील गर्दीत कोण विचारते, असा समज करून तिकीट न काढणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढतच आहे. मात्र, तिकीट तपासणी अधिकाऱ्यांनी पकडल्यावर पाचशे रुपयांचा दंड भरावा लागतो. दररोज ६० ते ७० जणांना विनातिकीट प्रवास करणाऱ्यांना पकडण्यात येते. त्यानुसार गेल्या वर्षभरात या फुकट्या प्रवाशांकडून तब्बल सव्वा कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



पुणे, पिंपरी चिंचवड आणि पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपीकडून सेवा दिली जात आहे. या बसमधून दररोज ११ ते १२ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामधून पीएमपीला दीड ते दोन कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. सध्या बसची संख्या कमी झाल्यामुळे बसला गर्दी वाढू लागली आहे. या गर्दीत काही प्रवासी विनातिकीट प्रवास करतात. त्यामुळे पीएमपीकडून बसमध्ये अशा प्रकारे प्रवास करणाऱ्यांवर कारवाईसाठी तिकीट तपासणीस (चेकर) ची पथके नेमण्यात आली आहेत.

या पथकांकडून वेगवेगळ्या मार्गांवर अचानक जाऊन बसची तपासणी केली जाते. त्यामध्ये महिन्याला दीड ते दोन हजार फुकटे प्रवासी सापडतात. पीएमपीचे तिकीट कमीत कमी पाच रुपये, तर जास्तीत जास्त ८० रुपयांपर्यंत आहे, तरीही काही प्रवासी तिकीट घेण्यात टाळाटळ करत असतात. या फुकट्या प्रवाशांमध्ये महाविद्यालयीन तरुण- तरुणांचीच संख्या अधिक वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रवाशांनी विनातिकीट प्रवास करू नये, असे वारंवार पीएमपी प्रशासनाकडून आवाहन केले जात आहे.

पीएमपीत ३५० कर्मचारी तिकीट तपासण्याचे काम करतात. त्यांना यासाठी खासगी चारचाकी वाहने देण्यात आली आहेत. तिकीट चेकरची पथके ३७९ पेक्षा अधिक मार्गांवर जाऊन बसची तपासणी करतात. विनातिकीट आढळून आल्यास प्रवाशांकडून दंड वसूल केला जातो. गतवर्षी १ कोटी १८ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून मालमत्ताधारकांना नोटिसा

## मालमत्तांचे नोंदणी व करआकारणी कार्यवाही करण्यासाठी स्थापत्य कन्सल्टंट प्रा.लि या खासगी कंपनीची नेमणूक करण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत आकारणी न झालेल्या मालमत्तांचे नोंदणी व करआकारणी कार्यवाही करण्यासाठी स्थापत्य कन्सल्टंट प्रा.लि या खासगी कंपनीची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्यामार्फत शहरातील मालमत्तांचे सर्वंकष सर्वेक्षण सुरू आहे.

मालमत्ता सर्वेक्षणात आकारणी न झालेल्या सद्यस्थितीत २ लाख ५१ हजार १६५ इतक्या नवीन मालमत्ता आढळून आल्या आहेत. त्यापैकी २ लाख ०३ हजार ८९४ मालमत्तेची मोजणी पूर्ण झाली असून त्यावर कर आकारणी कार्यवाही सुरू आहे. सर्वेक्षणात आढळून आलेल्या मालमत्तांपैकी १ लाख १३ हजार ८३१ या मालमत्तांचे मालमत्ताधारकांना मालमत्ताकर आकारणीसाठी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नोटीस, एसएमएस या माध्यमातून कळविण्यात आले आहे व येत आहे.

सदरची कागदपत्रे मालमत्तेस अद्यावत व बिनचूक नाव लावण्यासाठी व विशेष दिनांकापासून आकारणी करण्यासाठी आवश्यक आहेत. अद्यापपर्यंत ज्या मालमत्ताधारकांनी कागदपत्र सादर केलेली नाहीत अशा मालमत्ताधारकांना पुन्हा कागदपत्र मागणीपत्राची अंतिम नोटीस बजाविण्याची कार्यवाही सुरू आहे. कागदपत्रे मागणीची नोटीस समक्ष तसेच मालमत्ता बंद असल्यास मालमत्तेच्या दर्शनी भागावर लावून बजावणी करण्यात येत आहे. तरी मालमत्तेच्या नोंदणी व आकारणीसाठी आवश्यक असलेली पुढील कागदपत्रे संबंधित करसंकलन कार्यालयात पूर्तता करणे गरजेचे आहे.

नोटीस बजावूनही पूर्तता न केल्यास मालमत्ताधारकांस याबाबत कोणतेही स्वारस्य नाही असे समजण्यात येऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५० (अ) मधील तरतुदीनुसार सहा वर्षे मागे जाऊन मालमत्ताकराची आकारणी करणेशिवाय महानगरपालिकेला अन्य कोणताही पर्याय शिल्लकच राहणार नाही. त्यामुळे ज्या मालमत्ताधारकांना मालकी हक्काचे व बांधकाम पूर्णत्वाचे कागदपत्राचे पूर्तता करण्यासाठी मे. स्थापत्य कन्सल्टंट प्रा.लि या एजन्सीमार्फत नोटीस बजाविण्यात येत असून या कागदपत्रांची पूर्तता करावी, असे आवाहन करसंकलन विभागाद्वारे करण्यात आले आहे.

ज्या सोसायटीमध्ये संबंधित फ्लॅटधारक राहात नसतील,फ्लॅट बंद असेल किंवा फ्लॅट भाड्याने दिला असेल अशा सोसायटीचे अध्यक्ष व सचिवांनी संबंधित फ्लॅटधारकाला याबाबत कल्पना देणे आवश्यक आहे. अथवा संबंधित फ्लॅटधारकाचे फोन नंबर संबंधित एजन्सीच्या कर्मचाऱ्यांना देण्यात यावा. याबाबत सोसायटीचे अध्यक्ष व सचिव यांनी याबाबत पुढाकार घेणे आवश्यक आहे.




> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील अद्यापि आकारणी न झालेल्या मालमत्ताधारकांनी मालमत्ता करआकारणीसाठी आवश्यक कागदपत्रे सात दिवसांमध्ये विभागीय करसंकलन कार्यालयामध्ये जमा करावीत. मालमत्ताधारकांना बजाविण्यात आलेल्या नोटीसवर देण्यात आलेल्या पत्त्यावर पोस्टाद्वारे किंवा नमूद केलेल्या ई-मेलद्वारेही कागदपत्रांची पूर्तता करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून मालमत्ताधारकांनी तत्काळ संबंधित विभागाकडे कागदपत्रांची पूर्तता करावी. योग्य आकारणीसाठी नागरिकांनी या संधीचा उपयोग करून घेणे आवश्यक आहे. नोटीस बजावूनही कागदपत्रे सादर न केल्यास आणि अयोग्य आकारणी झाल्यास त्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहणार नाही.
>
> \- **अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

### मालमत्तेच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

- » इमारत/जमीन/फ्लॅटची मालकी हक्काची कागदपत्रे-खरेदीखत किंवा इंडेक्स २, सातबारा उतारा, मिळकतपत्रिका.
- » मालमत्ता एमआयडीसी/पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण/पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांच्याकडील असल्यास-रजिस्टर ॲग्रिमेंट, दस्त व संबंधित संस्थेने निर्गमित केलेले ताबा पत्राची सत्य प्रत.
- » मिळकतीबाबत नोंदणीकृत बक्षीसपत्र / वाटणीपत्र झाले असल्यास त्याची सत्य प्रत.
- » इमारत बांधकाम परवानगी प्राप्त असल्यास मंजूर बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व मंजूर नकाशाची प्रत, या कागदपत्रांची संबंधित मालमत्ताधारकांनी पूर्तता करणे अत्यंत आवश्यक आहे.

# जमीन परताव्याबाबत पीएमआरडीएकडून शेतकऱ्यांना दिलासा

## कायदेशीर, गुंतागुंतीच्या नऊ प्रकरणात अंतिम छाननीनंतर परताव्याचा मार्ग होणार मोकळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीच्या बदल्यात परतावा देण्याबाबत मोठे पाऊल पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाने उचलले आहे. गेल्या चाळीस वर्षांपासून अडकलेल्या कायदेशीर आणि गुंतागुंतीच्या प्रकरणातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत नऊ प्रकरणात आवश्यक पत्रांची पूर्तता पूर्ण झाली असून, अंतिम छाननी सुरू आहे. यानंतर संबंधित शेतकऱ्यांना परताव्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच, आणखी काही प्रकरणाबाबत पाठपुरावा देखील सुरू करण्यात आला आहे.

तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने काही वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या त्या अनुषंगाने संपत्तीत जमीन मालकांना ६.२५ टक्के प्रमाणे परतावा देण्यास शासनाच्या नगर विकास विभागाकडून परवानगी मिळाली होती. मात्र, या किचकट आणि गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये शेतकरी पुढे येत नव्हते, अखेर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने एक पाऊल टाकत याबाबत अर्ज करण्याची आवाहन केले. त्याचप्रमाणे अनेकदा बैठका घेऊन याबाबत अंमलबजावणी देखील करण्यात आली. सुटसुटीत कागदपत्रे आणि पाठपुरावा केल्यानंतर टप्प्या टप्प्याने प्राधिकरणामध्ये प्रकरणे दाखल होऊ लागली. सद्यस्थितीमध्ये ३२ प्रकरणे ही दाखल झाली असून, त्यातील काही प्रकरणांमध्ये कायदेशीर वारस नोंद बाबत कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. तर, इतर प्रकरणात सर्व कागदपत्रे जमा करण्यात आलेली आहेत.

सद्यस्थितीमध्ये ९ अर्जांमध्ये संबंधित वारसदारांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. त्यानुसार ती कागदपत्रे अंतिम छाननी करण्यासाठी ठेवण्यात आलेली आहेत. तर, ३२ प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना संबंधित प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पत्र पाठवले आहे. त्यानंतर त्या अर्जांचीदेखील प्रक्रिया सुरू करण्यात येईल.




### 106 शेतकऱ्यांना मिळणार लाभ

» २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पिंपरी-चिंचवडमध्ये आवश्यक जागा शिल्लक नसल्यामुळे ५० टक्के जागा आणि ५० टक्के 'एफएसआय' देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार संपादित क्षेत्राच्या ६.२ टक्के एवढी जमीन तिच्या मालकास प्राधिकरणाच्या अटींच्या अधिन राहून वाटप करण्यात येणार आहे. तसेच, अशा जमिनीचा परतावा करताना २ चटई क्षेत्र एवढा निर्देशांक मंजूर करण्यात येणार आहे. सन १९७२ ते १९८३ या कालावधीत १०६ शेतकऱ्यांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळू शकतो.

# बागायती टापूत तरुणांना झेडपीचे वेध

## विधानसभा निवडणुकीनंतर आता बागायती पट्ट्यातील लोकांचे विशेषत: तरुणांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला प्रचंड यश मिळाले. यामध्ये पुणे जिल्ह्यामध्ये देखील महायुतीचाच डंका वाजला. बारामती विधानसभेमध्ये देखील महायुतीचे उमेदवार अजित पवार यांनी मोठ्या मताधिक्याने पुतणे युगेंद्र पवार यांचा पराभव करून लोकसभेतील झालेल्या पराभवाची परतफेड केली.

विधानसभा निवडणुकीनंतर आता बागायती पट्ट्यातील लोकांचे विशेषत: तरुणांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे.

करंजेपूल- निंबूत जिल्हा परिषद गटामध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये निंबूत गणातील मुरूम, वाणेवाडी, वाघळवाडी, निंबूत, खंडोबाचीवाडी, गडदरवाडी या गणातील एकूण मतदार संख्या २० हजार ३०२ आहे. त्यापैकी १५ हजार ५५ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये अजित पवार यांना ६४.६८ टक्क्यांसह ९ हजार ७३८ लोकांनी मतदान केले. युगेंद्र पवार यांना ३१.०१ टक्क्यांसह ४ हजार ६६९ लोकांनी मतदान केले.



### तरुणांकडून नशिब आजमावण्याचा प्रयत्न

» जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका अवघ्या काही महिन्यांतच होणार आहेत तालुक्यावर अजित पवार गटाची एकहाती सत्ता व तालुक्यातील बऱ्याचअंशी सहकारी संस्थांवर अजितदादा गटाचे वर्चस्व असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी या गटाकडे इच्छुकांची मोठी गर्दी पहावयास मिळणार आहे. तरुण वर्ग देखील यामध्ये आपले नशीब आजमावण्याचा प्रयत्न करणार आहेत.

निंबूत पंचायत समिती गणामध्ये ५ हजार ६९ मतांचे लीड अजित पवार यांना मिळाले. करंजेपूल पंचायत समिती गणामध्ये चौधरवाडी, वाकी, सत्तावाडी, मगरवाडी, करंजे, सोरटेवाडी, करंजेपूल, होळ, शिरष्णे, सदोबाचीवाडी, कोऱ्हाळे खुर्द, लाटे, माळवाडी- लाटे ही गावे आहेत. गणामध्ये एकूण २३ हजार ४९६ मतदार संख्या असून १७ हजार ६९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ६१.४८ टक्क्यांसह १० हजार ८७९ लोकांनी अजित पवार यांना तर ३३.७९ टक्क्यांसह ५ हजार ९७९ लोकांनी युगेंद्र पवारांना मतदान केले. यामध्ये ४ हजार ९०० मतांचे लिड अजित पवार यांना मिळाले. दोन्हीही पंचायत समिती गणांत अजित पवार यांनाच लीड मिळालेले आहे. येत्या जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी इच्छुकांची मोठी गर्दी दिसणार आहे.

लोकसभेला ताई आणि विधानसभेला दादा हे समीकरण या मतदारसंघात बऱ्याच वर्षांपासून चालत आलेले आहे, विधानसभेला मी माझ्या गावातून, गणातून एवढ्या प्रमाणात मताधिक्य दिल्याने यावेळी माझाच नंबर लागू शकतो, अशी शक्यता खासगीत काही गावचे युवा वर्ग बोलून दाखवत आहेत. तालुक्यातील बऱ्याचअंशी सहकारी संस्थांवर अजितदादा गटाचे वर्चस्व असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी या गटाकडे इच्छुकांची मोठी गर्दी पहावयास मिळणार आहे. तरुण वर्ग देखील यामध्ये आपले नशीब आजमावण्याचा प्रयत्न करणार आहेत.

### निंबूत-करंजेपूल गटावर 'दादाराज'

» गेल्या तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थेवर प्रशासनाचा कारभार असल्याने मोठ्या प्रमाणात विकासकामे रखडलेली दिसत आहेत. निंबूत-करंजेपूल झेडपी गटावर काकडे व जगताप यांचेच वर्चस्व राहिले आहे. या गटाचा आरक्षणाचा विषय न्यायप्रविष्ठ असल्याने मागील आरक्षणावर देखील ही निवडणूक होण्याची शक्यता दिसत आहे. परंतु सध्या तरी विधानसभेच्या निकालानुसार या गटावर अजित पवार गटाचेच वर्चस्व राहिल्याचे निकालातून दिसत आहे.

# खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रयत्नांना यश !

## सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून केंद्र सरकारने 'शिवनेरी हापूस' आंब्याला जीआय मानांकन बहाल केले.

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नरच्या 'शिवनेरी हापूस' आंब्याला जीआय मानांकन मिळावे यासाठी नारायणगावच्या ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्राचे प्रयत्न आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून केंद्र सरकारने 'शिवनेरी हापूस' आंब्याला जीआय मानांकन बहाल केले.

जुन्नर तालुक्यात आंबा उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. हा हापूस आंबा वैशिष्ट्यपूर्ण चवीसाठी ओळखला जातो. त्यामुळे जुन्नरच्या हापूस आंब्याला 'शिवनेरी हापूस' म्हणून जीआय मानांकन मिळावे यासाठी नारायणगावच्या ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्र प्रयत्नशील होते. जुन्नरच्या 'शिवनेरी हापूस' आंब्याला जीआय मानांकन मिळावे यासाठी नारायणगावच्या ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्राचे प्रयत्न आणि खासदार डॉ.



अमोल कोल्हे यांचा सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले

शिवनेरी हापूस आंब्याला जीआय मानांकन मिळावा यासाठी खासदार डॉ. कोल्हे सन २०२२ पासून सातत्याने पाठपुरावा करीत होते. या प्रयत्नांना यश मिळाले असून जशी काश्मिरी केशर, बनारसी साडी किंवा दार्जिलिंग चहा या धर्तीवर जुन्नर तालुक्यातील आंब्याला 'शिवनेरी हापूस आंबा' अशी ओळख मिळाली आहे.

या संदर्भात खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की, जुन्नरच्या 'शिवनेरी हापूस आंब्याला' जीआय मानांकन मिळावे यासाठी ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्राचे गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. त्यानुसार वेळोवेळी प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून करण्यात आली. त्यामुळे या भागाचा लोकप्रतिनिधी खासदार म्हणून केंद्रीय वाणिज्यमंत्री पियुष गोयल यांच्याकडे पत्रव्यवहार व पाठपुरावा करीत होतो.

जी आय मानांकन हे उत्पादन आणि प्रदेशाशी निगडित आहे. कारण वेगवेगळ्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादित केले जाणाऱ्या उत्पादनाची गुणवत्ता वेगवेगळी असू शकते. ही ओळख कायम ठेवणे जीआय मानांकनामुळे शक्य होते.

त्यामुळे शिवनेरी हापूसला जीआय मानांकन मिळवून देण्यात खारीचा वाटा उचलता आला याचा विशेष आनंद आहे. त्याचबरोबर पालकमंत्री अजितदादा पवार व माजी आमदार अतुल बेनके यांचेही याकामी सहकार्य मिळाले, त्यांनाही मनापासून धन्यवाद देतो, अशी प्रतिक्रिया खासदार डॉ. कोल्हे यांनी दिली.

### जी आय मानांकन म्हणजे काय?

» एखादे उत्पादन ठराविक भौगोलिक परिस्थितीत विशिष्ट भागात घेतले जात असेल आणि त्याला काही विशिष्ट ओळख असेल तर त्याला जी आय मानांकन दिले जाते. हे मानांकन मिळाल्यास त्या उत्पादनाचे उगमस्थान निश्चित होते. नफा तसेच गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी उत्पादकांना त्याचा फायदा होतो. जी आय मानांकन हे उत्पादन आणि प्रदेशाशी निगडित आहे. कारण वेगवेगळ्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादित केले जाणाऱ्या उत्पादनाची गुणवत्ता वेगवेगळी असू शकते. ही ओळख कायम ठेवणे जीआय मानांकनामुळे शक्य होते.